**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः03.10.2023** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त देशाची आदरांजली

नागपूर जिल्ह्यातील शेतीच्या नुकसानाची कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केली पाहणी

नाशिक जिल्ह्यातील कांदा लिलाव आजपासून सुरू होणार

आणि

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला आतापर्यंत 13 सुवर्ण पदकं

## गांधी शास्त्री जयंती

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांना काल देशभरात आदरांजली वाहण्यात आली. नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महात्मा गांधी आणि लालबहाद्दूर शास्त्री यांना आदरांजली अर्पण केली.राज्यपाल रमेश बैस यांनी मुंबईत राजभवन इथं दोन्ही नेत्यांना पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. गांधी जयंतीनिमित्त राजभवन परिसरात राबवण्यात आलेल्या स्वच्छता अभियानात राज्यपालांनी सहभागी झालेल्या सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.उपमुख्यमंत्री आणि वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सेवाग्राम आश्रमाला भेट दिली आणि गांधीजींना अभिवादन केलं.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती तालुक्यातील बऱ्हाणपूर इथल्या पोलीस उपमुख्यालयात महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.गांधी जयंती निमित्त मुंबईत आयोजित ‘खादी महोत्सव 2023’चं उद्घघाटन केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांच्या हस्ते झालं. विलेपार्ले इथं 2 ते 31 ऑक्टोबर दरम्यान आयोजित या खादी महोत्सवाच्या माध्यमातून वोकल फॉर लोकल आणि आत्मनिर्भर भारत अभियानाला चालना देण्यात येत आहे.पुण्यात राष्ट्रीय

निसर्गोपचार संस्था, तसंच पुणे मेट्रोनं आयोजित केलेल्या विशेष कार्यक्रमात केंद्रीय संचार ब्यूरोच्या कलाकारांनी भाव्यांजली हा गांधी भजनांचा कार्यक्रम सादर केला. कार्यक्रम स्थळी मूर्तीकार आणि चित्रकार उत्तम साठे यांनी शाडू मातीच्या सहाय्याने महात्मा गांधीजींचं शिल्प साकारलं. नवी मुंबईत गांधी जयंती निमित्त स्वच्छता कामगारांचा सन्मान करण्यात आला तर यवतमाळ आणि जळगावमध्ये सदभावना यात्रा काढण्यात आली. नेरूळमध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छता फेरी काढली. अहमदनगर जिल्ह्यातल्या नेवासा इथल्या त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात महात्मा गांधी जीवनदर्शन चित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. सांगली, सोलापूर, रत्नागिरी धुळ्यासह विविध जिल्ह्यात महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांना विविध उपक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आलं.गोदावरी नदीचं प्रदूषण टाळण्यासाठी तसंच 2027 च्या सिंहस्थ कुंभमेळ्या पर्यंत गोदावरी प्लास्टिक मुक्त करण्यासाठी जलतज्ज्ञ राजेंद्रसिंह यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये कालपासून अविरल गोदावरी अभियानाला प्रारंभ झाला. स्वच्छता ही सेवा अभियान आणि गांधी जयंतीचं औचित्य साधून नाशिकला रामकुंड इथं या अभियानाचा  प्रारंभ करण्यात आला.स्वच्छता आणि सरकारी कार्यालयातील प्रलंबित कामांचा निपटारा करण्यासाठी एका विशेष मोहीमेचा तिसरा टप्पा कालपासून सुरू झाला. 31 ऑक्टोबरपर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे. या मोहिमेअंतर्गत राज्यात विविध ठिकाणी स्वच्छता मोहिमेचं आयोजन करण्यात आलं.

**आकाशवाणी**

पुणे आकाशवाणी केंद्रामध्येही काल राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना अभिवादन करून स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. एक ऑक्टोबरलाही सकाळी श्रमदानाद्वारे स्वच्छता मोहीम राबवून स्वच्छता शपथ घेण्यात आली. काल आकाशवाणी पुणे केंद्राच्या स्थापनेला 70 वर्षे पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर अधिकारी कर्मचाऱ्यांनी मनोगत व्यक्त केलं; त्यानंतर वृक्षारोपण करण्यात आलं. फॉरेंजर्स या स्वयंसेवी समूहाच्या कार्यकर्त्यांनी यावेळी सहकार्य केलं. आकाशवाणीतील सर्व विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या उपक्रमामध्ये मोठ्या संख्येनं सहभाग घेतला.

**नागपूर मुंडे**

राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभं आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विम्याचा 25 टक्के अग्रीम दिवाळीच्या आत जमा करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याचं प्रतिपादन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं. त्यांनी काल नागपूर शहर आणि जिल्ह्यात झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसानंतर, शेतीच्या नुकसानीचा आढावा घेतला.तसंच परिसराची पाहणी त्यांनी केली. यावर्षी राज्यात 1 कोटी 70 लाख शेतकऱ्यांनी विक्रमी पीक विमा काढला असून, आंतरपिकांचाही विमा काढण्यात आलेला आहे.शेतकऱ्यांच्या एक रुपया व्यतिरिक्त,

उर्वरित विम्याचा हफ्ता शासनानं भरल्याचं देशात पाहिलं उदाहरण असल्याचं मुंडे यांनी सांगितलं.

## कांदा

कांदा निर्यात शुल्क कमी करण्याच्या मागणीसह विविध मागण्यांसाठी गेल्या 20 सप्टेंबरपासून नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी पुकारलेलं लिलाव बंद आंदोलन अखेर मागे घेतलं आहे. नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत काल व्यापारी प्रतिनिधींची बैठक झाली; यावेळी व्यापाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात महिनाभरात निर्णय घेण्याचं आश्वासन मंत्र्यांनी दिलं; त्यानंतर व्यापाऱ्यांनी लिलाव बंद मागे घेतलं. त्यामुळे आजपासून जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये लिलाव पुन्हा सुरू होणार आहेत.

## विचारमंथन संमेलन सज्जनगड

श्री रामदास स्वामी संस्थानच्या वतीनं देशभरातील रामदासी मठांचे मठपती, संपर्क कार्यालय प्रमुख आणि कार्यकर्ते यांचं वार्षिक विचारमंथन संमेलन गेल्या रविवार आणि सोमवारी सज्जनगडावर आयोजित करण्यात आलं होतं. दरवर्षी एकंदर वर्षभरातील कामाचा आढावा आणि पुढील नियोजन अशा स्वरूपात असणाऱ्या या संमेलनाचं  यंदाचं  स्वरूप मात्र काहीसं वेगळं होतं. त्याविषयी अधिक माहिती देणारा हा वृत्तांत...

**सोळाव्या शतकात रामराज्य निर्मितीचं  स्वप्न पहात अध्यात्म, परमार्थ यांच्या बरोबरीने राष्ट्रप्रेम आणि स्वधर्मनिष्ठा यांची शिकवण महाराष्ट्राला दिली ती समर्थ रामदासस्वामी यांनी! तो वारसा पुढे नेतानाच अध्यात्म क्षेत्रातील दिग्गजांनी देशापुढील सध्याचे महत्त्वाचे प्रश्न समाजाला समजावून सांगावेत, त्यातून उज्वल भवितव्यासाठी मार्गदर्शन करावं आणि राष्ट्रउभारणीच्या कार्यामध्ये आपल्या सक्रिय योगदानासह समाजाला सहभागी करून घ्यावं, असा या संमेलनाच्या आयोजनामागील हेतू होता. रामदासी मठांची यासाठीची उपयुक्तता अधोरेखित व्हावी आणि देशभरातील मठांचं  संघटन अधिक बळकट करतानाच त्या मठांच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम मोठ्या प्रमाणात व्हावेत यासाठी या दोन दिवसांमध्ये विचारमंथन करण्यात आलं.श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या संमेलनात 'देशापुढील समस्या आणि संतांचे योगदान',  'वसुधैव कुटुम्बकम',  'सर्वेऽपि सुखीनः संतु', 'मठांचं कार्य आणि विस्तार',  'समर्थ रामदास आणि संघटन शक्ती' इत्यादी विषयांवर विचारवंतांनी मार्गदर्शन केलं आणि चर्चा करण्यात आली. देशभरातील 300 हून अधिक मठपती त्यासाठी उपस्थित होते. समाजाला राष्ट्रोन्नतीच्या मार्गावर नेणारा अध्यात्मिक**

**शक्तीचा हा सहभाग खरोखरीच मौल्यवान म्हणायला हवा ! आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून स्वाती महाळंक.**

## फडणवीस वर्धा जिमाका

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी तरुणांना भजनाद्वारे प्रबोधन केलं तसंच संपूर्ण समाजाला दिशा देण्याचं काम त्यांनी केलं, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. वर्धा जिल्ह्यातल्या हिंगणघाट तालुक्यातील श्रीक्षेत्र आजनसरा इथं ,राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज साहित्य संमेलनाचं उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते.

## दहशतवादी

दिल्ली पोलिसांच्या एका विशेष पथकानं काल संशयित आयसिस दहशतवादी शाहनवाज याला दक्षिण दिल्लीच्या जैतपूर इथून अटक केली. राष्ट्रीय तपास यंत्रणा, अर्थात एआयएनं त्याच्यावर तीन लाख रुपयांचं बक्षीस ठेवलं होतं. पुणे आयसिस प्रकरणी शाहनवाजचा शोध सुरू होता.

## अपघात बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा जवळ, मजुरांना घेऊन जाणाऱ्या ट्रकला काल सकाळी अपघात झाला; यात 5 मजूरांचा जागीच मृत्यू झाला. तर 4 जण गंभीर जखमी झाले आहेत. हे सर्व मजूर वेगवेगळ्या भागांमधून काम करण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यात आले होते.

## किशोर कुलकर्णी निधन

ज्येष्ठ गायक आणि संगीतकार किशोर कुलकर्णी यांचं रविवारी पुण्यात अल्पशा आजाराने निधन झालं. ते 58 वर्षांचे होते. त्यांनी स्वतः संगीतबद्ध आणि स्वरबद्ध केलेल्या "नादातून या नाद निर्मितो, श्रीराम जय राम जय जय राम" या गोंदवलेकर महाराजांच्या गजरामुळे ते मराठी रसिकांच्या घराघरात पोहोचले. स्वामी समर्थ, गजानन महाराज यांच्यावरील रचनांमुळे त्यांनी संगीत विश्वात वेगळी छाप निर्माण केली.

## आशियाई

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं आतापर्यंत 13 सुवर्ण, 24 रौप्य आणि 23 कास्य पदकांसह 60 पदकं पटकावली असून पदकतालिकेत भारत चौथ्या स्थानावर आहे. काल 4 बाय 400 मीटर मिश्र रिले स्पर्धेत भारतीय संघानं रौप्य पदक पटकावलं; तर महिलांच्या लांब उडी स्पर्धेत अँसी सोजन हिनं रौप्यपदक पटकावलं. 3 हजार मीटर स्टीपलचेस स्पर्धेत भारताच्या पारुल चौधरी हिला रौप्य तर प्रिती लांबा हिला कास्य पदक मिळालं.

**हवामान**

दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि परिसरांत निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा आता विरला आहे. उद्या सकाळपर्यंत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून मराठवाड्यात हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**